## वेचक

### खोक्रल शांतादुर्गा मंदिरात २५ रोजी सत्संग

**दोडामार्ग (प्रतिनिधी)**

खोक्रल ग्रामविकास मंडळ मुंबई, सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त २५ मे रोजी शांतादुर्गा मंदिरात काडसिद्धेश्वर महाराज कणेरी सिद्धगिरी मठाधिपती यांच्या उपस्थित अध्यात्म सत्संग आनंद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे. २५ मे रोजी सकाळी १० ते २ या वेळेत वैद्यकीय तपासणी, सत्कार सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम, सायंकाळी ५ वाजता सिद्धगिरी वस्तू भंडाराचा उद्घाटन सोहळा, सायंकाळी सांप्रदायिक मंडळीचे भजन, ६ वा. काडसिद्धेश्वर स्वामी महाराज यांचे स्वागत, सत्कार, दर्शन सोहळा त्यानंतर दासबोध वाचन व प्रवचन होणार आहे.

### आमोणे वेताळ मंदिराचा वर्धापनदिन

**पणजी (पत्रक)**

आमोणे येथील श्री वेताळ देवस्थानचा पुनर्स्थापना दिवस तथा ५५वा वर्धापनदिन सोहळा येत्या गुरुवार दि. २३ मे रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त सकाळी ८.३० वाजल्यापासून महाभिषेक, स्वाहाकार, दुपारी श्रीची महापूजा, नंतर महाप्रसाद होणार आहे. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गणेशाय क्लबतर्फे १८ रोजी नृत्य स्पर्धा

**केरी-सत्तरी (वार्ताहर)**

मोर्ले-सत्तरीतील श्री गणेशाय स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे शनिवार १८ मे रोजी केरी व मोर्ले पंचायत मर्यादित नृत्य स्पर्धेचे (समूह व एकेरी) आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा बेकरीजवळील केसरकरवाडा मोर्ले येथे सादर होणार आहे. समूह नृत्यासाठी जास्तीत जास्त ८ कलाकार असणे अपेक्षित आहे. प्रथम पारितोषिक रु. ३३३३ व चषक, द्वितीय रु. २२२२ व तृतीय रु. ११११ देण्यात येणार आहे. एकेरी नृत्य (वयोगट ५ ते १२ वर्षे) प्रथम पारितोषिक रु. ११११ व चषक, द्वितीय रु. ७७७, तृतीय रु. ५५५. एकेरी नृत्य (१२ वर्षांवरील) प्रथम पारितोषिक रु. १५५५ व चषक, द्वितीय रु. ११११ व तृतीय रु. ७७७ ठेवण्यात आले आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी ९७६४५२४४५९, ७०३०२७१३९८ किंवा ९४२३८८३५७८ वर संपर्क साधावा.

### गोमंतक मराठा समाज शिष्यवृत्ती अर्ज

**पेडणे (पत्रक)**

दरवर्षीप्रमाणे गोमंतक मराठा समाज पेडणे समितीतर्फे दिले जाणारे शिष्यवृत्ती अर्ज २२ मे रोजी पेडणे येथे मीलन कामुलकर यांच्या निवासस्थानी संध्याकाळी ४ वाजता दिले जाणार आहेत. त्याकरिता तालुका समितीच्या सर्व सभासदांनी तसेच तालुक्यातील सर्व समाजबांधवांनी व भगिनींनी या बैठकीस उपस्थित राहावे. सदर अर्ज पूर्ण भरून व त्यास आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे जोडून १० जून २०१९ पूर्वी तालुका समितीकडे देण्यात यावेत. अधिक माहितीकरिता पेडणे तालुका समितीच्या अध्यक्ष सुविधा कोरगावकर, दूरध्वनी ७७६८९५९४०७ यांच्याशी संपर्क साधावा.



*वीजमंत्री नीलेश काब्राल यांना निवेदन सादर करताना भाजपचे युवानेते सौरभ लोटलीकर. बाजूस विजेश नाईक आणि मंगलदास च्यारी.*

### मडकईतील वीज समस्येविषयी निवेदन

**कुडचडे (पत्रक)**

मडकई मतदारसंघाचे भाजपचे युवानेते सौरभ लोटलीकर यांनी गोव्याचे वीजमंत्री नीलेश काब्राल यांची भेट घेऊन मडकई मतदारसंघाच्या विजेसंबंधी येणाऱ्या समस्यांसाठी निवेदन दिले. त्यात खासकरून दुर्बाट, आडपई, आगापूर, तळावली, कपिलेश्वरी, रामनाथी या भागातील वीजवाहिन्या जेथे विजेच्या समस्या आहेत त्याची पावसाळा सुरू होण्याआधी पूर्ण तपासणी करून वीजपुरवठा व्यवस्थित सुरू व्हावा आणि याचा कोणत्याही विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना वीजपुरवठा खंडित झाल्यास त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी याविषयी वस्तुस्थिती मांडण्यात आली आहे. वीजमंत्री नीलेश काब्राल यांनी मडकई मतदारसंघात विजेसंबंधी येणाऱ्या समस्यांचे निराकरण लवकरात लवकर होईल असे आश्वासन दिले. यावेळी विजेश नाईक आणि मंगलदास च्यारी उपस्थित होते.

### कुट्ठाळी हनुमान मंदिर वर्धापनदिन साजरा

**वास्को (प्रतिनिधी)**

कोनसुवा-कुट्ठाळी येथील श्री हनुमान मंदिर संस्थानचा ३०वा वर्धापनदिन सोहळा अलीकडेच विविधांगी कार्यक्रमांनी थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्त सुजाता व सुभाष गावकर यांच्या यजमानपदाखाली रामतारक हवन व इतर धार्मिक विधी करण्यात आले. त्यानंतर नामांकित कलाकारांचे भजन सादर करण्यात आले. त्यात प्रदीप च्यारी, सुहास च्यारी, नागेश च्यारी या गायकांचा समावेश होता. त्यांना दामोदर नाईक (हार्मोनियम), निशिकांत कळंगुटकर (तबला) यांनी संगीतसाथ दिली. भजनानंतर श्रीची पालखी व नृत्याचा कार्यक्रम पार पडला.

### आमोणे पूर्वस बेताळ वर्धापनदिन गुरुवारी

**आमोणे (पत्रक)**

येथील सुप्रसिद्ध देव श्री पूर्वस बेताळ देवाचा ५९वा वर्धापनदिन सोहळा येत्या गुरुवार २३ मे रोजी विविध कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येणार आहे.
वर्धापनदिन उत्सवप्रित्यर्थ मंदिरात सकाळी ८.३० वा. परंपरागत पुण्यवाहन, महाअभिषेक, लघुरुद्र अनुष्ठान सोहळा आदी विधी, तर दुपारी १२.३० वा. महाआरती, महागाऱ्हाणे नंतर तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. या उत्सवास बहुसंख्य भाविक, भक्तगणांनी उपस्थित राहावे तसेच सायंकाळी होणाऱ्या नाट्यप्रयोगासही हजर राहून संपूर्ण दिवसाचा हा उत्सव यशस्वी करण्याचे आवाहन सदर देवस्थान समितीतर्फे करण्यात आलेले आहे.



*आल्त दाबोळी ते विमानतळापर्यंत पूर्ण झालेला ग्रेटर सेपरेटर उड्डाण पूल.*



*विमानतळ ते वास्कोपर्यंत संथगतीने होत असलेले दुसऱ्या उड्डाण पुलाचे काम.*

# दाबोळीतील दोनपैकी एक उड्डाण पूल पूर्ण

**वास्को, दि. २० (वार्ताहर)**

दाबोळी विमानतळावरील दोन ग्रेटर सेपरेटर उड्डाण पुलांपैकी एका पुलाचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे, तर दुसऱ्या उड्डाण पुलाचे काम संथगतीने होत असल्याने सदर बांधकाम करणाऱ्या कंपनीने विमानतळावर दररोज येणाऱ्या वाढत्या वाहनांची संख्या लक्षात घेऊन त्वरित ग्रेटर सेपरेटर पुलाचे काम पूर्ण करावे, अशी स्थानिकांची मागणी आहे.

दाबोळी विमानतळावरून पर्यटकांना ये-जा करताना वाहनातून कोणताही त्रास होऊ नये म्हणून राज्य सरकारने गेल्या वर्षापासून बांधण्यास घेतलेल्या ग्रेटर सेपरेटर उड्डाण पुलाचे काम अनेक तांत्रिक कारणामुळे बंद पडू लागले. नंतर स्थानिक आमदार तथा पंचायतमंत्री मादिन गुदिन्हो यांनी स्वतः या कामाचा पाठपुरावा करत कामाला चांगला प्रकारे गती देण्यात आली. त्यामुळे आल्त दाबोळी विमानतळापर्यंतच्या एका बाजूला ग्रेटर सेपरेटर उड्डाणपूल जवळ जवळ पूर्ण झाला असून फक्त रस्ता जोडण्याचे तेवढे काम शिल्लक राहिलेले आहे. उड्डाण पुलावर विजेची जोडणी देण्याचे काम हाती घेण्यात आले असल्याची माहिती येथे काम करणाऱ्या कंत्राटदारांनी दिली आहे.

आल्त दाबोळी ते विमानतळपर्यंतचा ग्रेटर सेपरेटर उड्डाणपूल पूल पूर्ण झाला असला तरी विमानतळ ते वास्को शांतीनगरपर्यंत रस्ता मात्र कासवाच्या गतीने होत असल्याचे अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही महिन्यांपूर्वी या उड्डाण पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले मात्र अचानक काम खूपच संथगतीने होत असल्याने बहुतेक ठिकाणी काम अर्धवट राहिलेले आहे. त्यामुळे एका बाजूच्या उड्डाण पुलाचे काम कधी पूर्ण होणार? असा प्रश्न सामान्य नागरिकांबरोबर दाबोळी विमानतळावर येणाऱ्या वाहनचालकांना पडलेला आहे. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी किंवा विमानतळ प्राधिकरणाने याविषयी योग्य ती पावले उचलावी अशी मागणी होत आहे.

# भाजपला डिचोली मतदारसंघात मोठी आघाडी

## आमदार राजेश पाटणेकर, वल्लभ साळकर यांचा दावा

**डिचोली, दि. २० (प्रतिनिधी)**

लोकसभा निवडणुकीची निकाल एक महिन्याच्या विश्रांतीनंतर येत्या २३ रोजी होणार असून, उत्तर गोव्यातून श्रीपाद नाईक मोठी आघाडी घेऊन विजयी होणार असल्याचा दावा भाजपने केला आहे. त्यात डिचोली मतदारसंघातून मोठी आघाडी मिळणार असल्याचा दावा केला जात आहे.

डिचोली मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाला किमान १६५०० मते मिळणार असा विश्वास भारतीय जनता पपक्षाचे डिचोलीचे अध्यक्ष वल्लभ साळकर तसेच आमदार राजेश पाटणेकरर यांनी व्यक्त केला आहे.

आज भाजप मंडळ समितीची मतदारसंघातील सर्व बूथ प्रमुख कार्यकर्ते यांची बैठक बोलावून मतदानाचा सविस्तर आढावा घेतला. डिचोली शहर व पाच पंचायत विभागांत सर्वच बुथवर भाजपला आघाडी मिळणार असा दावा यावेळी करण्यात आला.

यावेळी वल्लभ साळकर यांनी विरोध दिसला नाही. सर्वच ठिकाणी प्रभावी मतदान झाले असून त्याचा मोठा फयदा अपेक्षित आहे असे सांगितले. आमदार राजेश पाटणेकर यांनी श्रीपाद नाईक यांनी गेल्या २० वर्षात अनेक योजना डिचोली व ग्रामीण भागात राबवल्या आहेत. या खेपेला विरोधक फारसे दिसलेच नाहीत तसेच भाजपची डिचोली मतदारसंघातील पकड ही खूपच मजबूत असून सर्व घटक प्रामाणिकपणे वावरल्याने व मोदीजींची लाट देशात आहे. त्यामुळे देशाची धुरा पुन्हा मोदीजींकडे येणार हे आताच स्पष्ट झाले आहे असे पाटणेकर यांनी सांगितले.

**काँग्रेसला आशा**

डिचोली मतदारसंघतून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपल्या परीने प्रामाणिकपणे प्रचार केला आहे. गिरीश चोडणकर यांनी तीनवेळा मतदारसंघाचा दौरा केला व विविध बैठका घेतल्या. खाण अवलंबितांनी कोणती भूमिका घेतली आहे ते पाहावे लागेल. गट अध्यक्ष मेघश्याम राऊत यांनी काँग्रेस निश्चितपणे समाधानकारक मजल मारणार असा विश्वास व्यक्त केला आहे

माजी आमदार नरेश सावळ यांनी आपली भूमिका नेमकी कशी निभावली व त्यांच्या समर्थकांनी कोणती भूमिका घेतली त्यातूनही काही प्रमाणात मतांचा फरक दिसून येणार आहे

# मयेत सोळा हजारांपेक्षा अधिक मते

## आमदार प्रवीण झांट्ये यांना विश्वास

**डिचोली, दि. २० (प्रतिनिधी)**

लोकसभा निवडणुकीत मये मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाला किमान सोळा हजार मते मिळणार असल्याची खात्री आमदार प्रवीण झांट्ये यांनी व्यक्त केली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी प्रचारात मोठे सहकार्य केले. त्या सर्वांचे आभार व्यक्त करताना माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर व खासदार श्रीपाद नाईक यांनी या मतदारसंघात अनेक योजना मार्गी लावताना सामाजिक मानवी जीवन सुखकर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला असून मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करून प्रत्येक पंचयात विभागाचा विकास केला आहे. प्रत्येक घरात विविध सामाजिक योजनेचा लाभ मिळत असून सर्व घटकांनी भाजपला मोठी साथ दिली आहे, असे त्यांनी सांगितले.

मंडल अध्यक्ष दयानंद कारबोटकर, भाजप प्रवक्ते प्रेमानंद म्हांबरे, अंकिता न्हावेलकर यांनी भाजपला मोठी आघाडी मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. भाजपला १६०५० च्यावर मतदान होणार असल्याचे सांगण्यात आले.

आमदार प्रवीण झांट्ये यांनी प्रचारात झोकून देताना अनेक कोपरा बैठका तसेच घरोघरी प्रचार केला. बूथ मेळावे घेतले, संघटना मजबूत करून सर्व घटकांना संघटित करून प्रचाराची धुरा सांभाळली. त्याचे खूप चांगले परिणाम निकालात दिसतील असे कृष्णा परब व रमाकांत आमोणकर यांनी सांगितले

काँग्रेस पक्षातर्फे अनेक बैठका झाल्या, मात्र ठराविक कार्यकर्ते वावरताना दिसले मात्र त्याचा कितपत प्रभाव पडणार ते पाहावे लागेल. सुभाष किनळकर, अशोक नागवेकर, आनंद नाईक व इतर कार्यकर्ते प्रचारात सक्रिय होते. त्यांचा प्रभाव व खाण अवलंबित कामगार व इतर घटक कुणाला मतदान करणार, मगोचे कार्यकर्ते कोणाच्या बाजूने झुकले, त्यावर काँग्रेसची मते निश्चित होणार आहेत. काँग्रेस समाधानकारक मजल मारणार असा विश्वास आनंद नाईक यांनी व्यक्त व्यक्त केला आहे.

# बोरी ग्रामसभेला अल्प प्रतिसाद

## प्रश्नोत्तरांबाबतचा नवा नियम किचकट असल्याच्या प्रतिक्रिया

**बोरी, दि. २० (प्रतिनिधी)**

किचकटीच्या नव्या नियमांमुळे ग्रामसभांना अल्प प्रतिसाद लाभत आहे, असा प्रत्यय नुकत्याच झालेल्या तिमाही सभेत आला. यावेळी केवळ २० ते २२ नागरिक उपस्थित होते. सभेपेक्षा हे चर्चासत्र म्हटल्यास वावगे ठरणार नाही! सरपंच भावना नाईक यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिव कपिल नाईक यांनी मागील इतिवृत्तांत वाचून मान्यता मिळवली. तसेच तीन महिन्यांचा हिशोब सादर करून पुढील पूर्व नियोजित जमा-खर्च सादर केला.



*तिमाही ग्रामसभेला रिकाम्या असणाऱ्या खुर्च्या.*

पंचायतीत प्रश्न मांडायचे असल्यास ते लिखित स्वरूपात विहित मुदतीत सादर करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे ग्रामसभेला नागरिकांची उपस्थिती कमी होत आहे. या नियमावर पुन्हा एकदा विचार व्हावा, अशी मागणी उपस्थित नागरिकांनी केली.

यावेळी तिशे-बोरी येथील प्रशांत नाईक यांनी तीन महिन्यांपूर्वी विचारलेल्या प्रश्नांची पुन्हा खुलासावजा उत्तरे मागितली. त्यावर सचिव कपिल नाईक व स्थानिक पंच ज्योती मुकेश नाईक यांनी माहिती दिली. यावेळी बोरी गावात उड्डाणपुलाची मागणी करण्यात आली. त्यावर कपिल नाईक यांनी या प्रश्नी पाठपुरावा केल्याचे सांगितले.

दरम्यान, मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात यावीत, अशीही आग्रही मागणी करण्यात आली. याप्रसंगी पंच तुकाराम नाईक यांनी खार्जोडा परिसरातील समस्या वेळेत सोडविण्यात येतील, असे आश्वासन दिले. बैठकीला पंच सुनील सावकार, ज्योती नाईक, दीपिका नाईक, फिलोमिना वाझ, रूपाली नाईक, रामदास नाईक, तुकाराम नाईक उपस्थित होते.

# संजय ढवळीकर यांच्या दोन पुस्तकांचे २५ रोजी प्रकाशन

**पणजी, दि. २० (प्रतिनिधी)**

गोव्यातील राजकारणावर आधारित काल्पनिक राजकीय कथांचे दालन उघडणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार संजय ढवळीकर यांच्या 'हाती राहिले धुपाटणे' व 'राजकारण गेले चुलीत' या दोन कथासंग्रहांचे प्रकाशन शनिवार, २५ मे रोजी होत आहे.



पणजीतील हॉटेल मनोशांतीच्या सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता होणाऱ्या या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून अभिनेत्री, मानसोपचारतज्ज्ञ तथा लेखिका डॉ. मीनाक्षी मार्टिन्स ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील; तर ख्यातनाम उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते, लेखक दत्ता दामोदर नाईक हे अध्यक्षपद भूषवतील. कुंकळ्ळी येथील वैभव फोंडेकर यांच्या 'राही प्रकाशन'ने या दोन्ही पुस्तकांची निर्मिती केली आहे. आयोजित प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पैरा-मयेतून अखेर खनिज वाहतूक सुरू

## शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्याचे मामलेदारांचे आश्वासन

**डिचोली, दि. २० (प्रतिनिधी)**

पैरा-मये येथील एका खाण कंपनीच्या जागेतून ई-लिलाव झालेल्या मालाची वाहतूक डिचोलीचे मामलेदार प्रवीणजय पंडित यांनी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर आज (सोमवार) सुरू करण्यात आली. तूर्त मामलेदार पंडित यांनी कंपनीला पत्र लिहून या संदर्भात उत्तर मागितले आहे; तर नंतर या कंपनीच्या वरिष्ठांशी उच्च पातळीवरील बैठक घेऊन हा विषय धसास लावण्याचे आश्वासन दिले आहे.

गेल्या शुक्रवारी संबंधित कंपनीच्या जागेतून सुरू करण्यात आलेली ई-लिलाव खनिज मालाची वाहतूक मयेतील शेतकऱ्यांनी 'भारतीय किसान महासभेच्या गोवा विभाग' या बॅनरखाली रोखून धरली होती. खाण कंपनीकडून मयेतील शेतकऱ्यांना शेतजमिनींच्या झालेल्या नुकसानाची भरपाई अजूनही मिळाली नसल्याने ती अगोदर द्यावी व नंतरच या भागातून खनिज मालाची वाहतूक करण्यात यावी, अशी मागणी करत वाहतूक संध्याकाळपर्यंत रोखून धरली होती. या प्रकरणी डिचोलीचे पोलिस अधिकारी व नंतर मामलेदार प्रवीणजय पंडित हे स्वतः पैरा येथे जाऊन शेतकऱ्यांना भेटले व नंतर त्यांनी शेतकरी, खाण कंपनीचे अधिकारी व सदर ई-लिलावाच्या मालाची उचल करणाऱ्या कंत्राटदारासह संयुक्त बैठक घेतली होती. या बैठकीत सदर माल ई-लिलावाचा असल्याने त्याच्याशी खाण कंपनीचा कोणताही संबंध येत नाही. त्यामुळे ही माल वाहतूक रोखण्यात कोण ताही अर्थ नाही. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासंदर्भात कंपनीशी सविस्तर चर्चा करून हा विषय निकालात काढण्यात येईल, असे सांगितले.

डिचोली मामलेदारांनी यापूर्वी सदर कंपनीला शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला होता. मात्र, सदर आदेशाला कंपनीने न्यायालयात आव्हान दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची प्रक्रिया लांबली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी मयेचे आमदार प्रवीण झांट्ये यांची भेट घेऊन याविषयी चर्चा केली होती. आमदार झांट्ये यांनी या प्रकरणाशी संबंधित असलेल्या सर्व अधिकारीवर्गाशी संपर्क साधून शेतकऱ्यांचा विषय निकालात काढण्याची सूचना दिली होती. त्यानंतर आज सकाळी मयेतील शेतकरी मामलेदार प्रवीणजय पंडित यांना भेटण्यासाठी आले असता, मामलेदार प्रवीणजय पंडित यांनी सदर शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचा विषय निकालात काढण्यासाठी आपण कंपनीच्या संचालकांची उच्चस्तरीय बैठक घेऊन प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच संबंधित कंपनीला या संदर्भात तातडीने एक पत्र पाठवून त्यावर तत्काळ उत्तर मागितले आहे. त्यानंतर खनिज मालाची वाहतूक सुरू करण्यात आली.

**NOTICE**

Board Meeting to consider the annual audited financial results for the Financial Year ended 31st March, 2019 will be held on **Wednesday, 29th May, 2019.**

For **Kore Foods Limited**
**Jayashree Mishra**
Company Secretary-cum-Compliance Officer

Vision House, Tivim Industrial Estate, Mapusa, Goa 403 526
Dtd: 21/05/2019